# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर

# School Leadership Academy, Maharashtra

## सन २०२५-२६

## मोड्यूल क्रमांक : ६९

## परख (PARAKH) - राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षणातील विद्यार्थी संपादणूक वाढीसाठी मिशन उत्कर्ष अभियान अंतर्गत शालेय नेतृत्वाची भूमिका

## Role of School Leadership in Enhancing Student Achievement under Mission Utkarsh in the PARAKH National Educational Survey




### प्रास्ताविक -

परख (PARAKH) - राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षण हा भारतातील विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या पातळीचे मोजमाप करणारा एक राष्ट्रीय पातळीवरील उपक्रम आहे. या सर्वेक्षणातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूकतेविषयी महत्त्वपूर्ण माहिती मिळते. PARAKH (Performance Assessment, Review, and Analysis of Knowledge for Holistic Development) हे NEP २०२० अंतर्गत स्थापन केलेले राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र आहे. विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनात सुधारणा घडवून आणणे, आणि देशातील मूल्यांकन पद्धतीला एकसंध दिशा देणे हे PARAKH चे मुख्य ध्येय आहे.

परख (PARAKH) ही संस्था अस्तित्वात येण्यापूर्वी **राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS)** हे भारतातील सर्वात मोठे आणि प्रमुख सर्वेक्षण होते. यात इयत्ता 3 री, 5 वी, 8 वी आणि 10 वीच्या विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या पातळीचे (Learning Outcomes) मूल्यमापन केले जात असे. सदर सर्वेक्षण हे NCERT नवी दिल्ली यांचेमार्फत दर 3 वर्षांनी केले जात असत.

परख (PARAKH) ही संस्था अस्तित्वात येण्यापूर्वी NAS 2017 , NAS 2021 , SLAS 2023, FLS 2023 ही सर्वेक्षणे झालेली होती. ताचे 2022-23 पासून नियतकालिक मूल्यमापन चाचणी (PAT) घेण्यात येते. भारतामध्ये शालेय शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी केंद्र व राज्य शासन विविध उपक्रम राबवत आहेत. या प्रयत्नांमध्ये NAS (National Achievement Survey) व PGI (Performance Grading Index) हे दोन महत्त्वाचे मापन साधन ठरले आहेत. NAS द्वारे विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीचे मूल्यमापन केले जाते, तर PGI द्वारे शालेय शिक्षण व्यवस्थेची एकूण गुणवत्ता तपासली जाते.

महाराष्ट्र राज्याने या दोन्ही निर्देशांकांमध्ये सातत्याने प्रगती केली असून, त्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्याने उल्लेखनीय यश संपादन करून एक आदर्श निर्माण केला आहे. योग्य नियोजन, डेटा-आधारित निर्णय, मुख्याध्यापक व शिक्षकांचे समर्पण आणि प्रभावी प्रशासन यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे कोल्हापूर जिल्ह्याने NAS व PGI मध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

ही यशोगाथा केवळ एका जिल्ह्याची कामगिरी नसून, ती गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रभावी धोरण, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि संघभावनेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यामुळे इतर जिल्ह्यांसाठीही ही एक प्रेरणादायी दिशा ठरते.

परख (राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षण) व विद्यार्थी संपादन (Learning Outcomes) वाढ या विषयावर तयार केलेले मॉड्युल मुख्याध्यापकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. कारण हे मॉड्युल फक्त माहिती देणारे नसून **शाळेच्या प्रत्यक्ष गुणवत्तावाढीशी जोडलेले मार्गदर्शन** देते.

**खालील मुद्द्यांमधून त्याची उपयुक्तता स्पष्ट होते.**

**१. शाळेची सद्यस्थिती समजून घेण्यासाठी**

- परख सर्वेक्षणामुळे शाळेतील विद्यार्थ्यांची **वास्तविक शैक्षणिक पातळी (Learning Level)** समजते
- मुख्याध्यापकांना **विषयवार व कौशल्यवार कमतरता** ओळखता येते
- डेटा आधारित निर्णय घेण्याची सवय लागते.

**२. SMART उद्दिष्टे निश्चित करण्यास मदत**

- मॉड्युलमुळे मुख्याध्यापकांना Specific (विशिष्ट) Measurable (मोजता येणारी) Achievable (साध्य होणारी) उद्दिष्टे ठरवता येतात.

**३. शिक्षकांना मार्गदर्शन व शैक्षणिक नेतृत्व**

- मुख्याध्यापक **Instructional Leader** म्हणून काम करू शकतात.
- शिक्षकांना योग्य अध्यापन पद्धती, remedial teaching सुचवता येते.
- वर्ग निरीक्षण अधिक प्रभावी होते.

**४. विद्यार्थी संपादन (Learning Outcomes) वाढविणे**

- कमी स्तरावर असलेल्या विद्यार्थ्यांसाठी **Remedial Action Plan** तयार करता येतो
- *Activity-based learning* व *competency-based learning* वाढवता येते
- प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करता येते

**५. पालक व समुदाय सहभाग वाढविणे**

- पालकांना विद्यार्थ्यांची प्रगती समजावून सांगता येते
- समुदायाच्या मदतीने शैक्षणिक सुधारणा घडवता येते त्यामुळे मुख्याध्यापक डेटा आधारित निर्णय घेऊ शकतात.
- शिक्षकांना प्रभावी मार्गदर्शन देऊ शकतात

- आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे **विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रत्यक्ष सुधारण्यास मदत करू शकतात.**

**घटक संच उद्दिष्टे -**

१. परख (PARAKH) राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षण बाबत माहिती देणे.
२. मूल्यांकन प्रक्रियेत शालेय नेतृत्वाची महत्त्वपूर्ण भूमिका ओळखण्यास मदत करणे.
३. विद्यार्थ्यांच्या क्षमता-विकासातील अडथळे ओळखण्यास मदत करणे..
४. क्षमता आधारित अध्यापन व मूल्यांकन प्रक्रिया समजावून सांगणे.
५. शालेय नेतृत्वाची शाळास्तरावर डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया विकसित करणे.
६. शिक्षणातील गुणवत्तावृद्धीसाठी कृती आराखडा तयार करण्याचे कौशल्य विकसित करणे.
७. शालेय नेतृत्त्वाने कृती आराखड्यानुसार अंमलबजावणी करणे.

**महत्त्वाचे शब्द/ संकल्पना -**

- **PARAKH -** (Performance Assessment, Review and Analysis of Knowledge for Holistic Development) PARAKH हे राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP २०२०) अंतर्गत स्थापन केलेले राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र आहे. याचे काम म्हणजे देशातील विविध बोर्डांच्या परीक्षा व मूल्यांकन पद्धतींचे एकसंध मानक तयार करणे, विद्यार्थ्यांच्या शिकण्याचे स्तर वस्तुनिष्ठपणे मोजणे, आणि शालेय शिक्षणामध्ये क्षमता-आधारित मूल्यांकनाची अंमलबजावणी करणे. PARAKH राष्ट्रीय संपादन सर्वेक्षणांचे समन्वयन करते आणि शिक्षणाच्या गुणवत्तावृद्धीसाठी धोरणात्मक मार्गदर्शन देते.
- **NAS - National Achievement Survey (राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण)-** NAS हे NCERT द्वारे आयोजित केलेले राष्ट्रीय पातळीवरील विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे सर्वेक्षण आहे. इयत्ता 3, 5, 8 आणि 10 च्या विद्यार्थ्यांचे विषयानुसार ज्ञान, कौशल्ये आणि संकल्पना किती आत्मसात झाल्या आहेत हे NAS मोजते. देशातील शैक्षणिक गुणवत्तेची वास्तविक स्थिती ओळखण्यासाठी NAS अत्यंत उपयुक्त आहे. राज्य, जिल्हा आणि शाळास्तरावर शिक्षणातील सुधारणा करण्यासाठी NAS डेटा वापरला जातो.
- **PARAKH राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षण 2024 -** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार शैक्षणिक मूल्यांकनाचे निकष व मार्गदर्शक तत्वे ठरविण्यासाठी PARAKH या राष्ट्रीय संस्थेची स्थापना केलेली आहे. NEP 2020 मध्ये नमूद केलेल्या वरील उद्दिष्टांशी सुसंगत राहून, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 च्या परिच्छेद 4.4.1 द्वारे अनिवार्य केलेल्या इतर कार्यांसह मानके, मानके, मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे आणि विद्यार्थी मूल्यांकनाशी संबंधित क्रियाकलाप अंमलात आणणे या मूलभूत उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी, 8 फेब्रुवारी 2023 रोजी NCERT च्या अधिसूचना क्रमांक 1-4/2012-EC/ 101- 164 द्वारे राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र-परख (समग्र विकासासाठी ज्ञानाचे कार्यप्रदर्शन मूल्यांकन, पुनरावलोकन आणि विश्लेषण) ची स्थापना NCERT येथे एक स्वतंत्र घटक संस्था म्हणून करण्यात आली आहे.

**PARAKH ने हाती घेतलेले प्रमुख उपक्रम**

- **समग्र विकासासाठी क्षमता-आधारित मूल्यांकन -** पायाभूत, पूर्वतयारी, मध्यम आणि माध्यमिक टप्प्यांसाठी समग्र प्रगती कार्डचा विकास आणि प्रसार करणे. क्षमता-आधारित अध्ययन-अध्यापनाचे मूल्यांकन अधिक व्यापक आणि समग्र स्वरूपाचे करून मदत करण्यासाठी 360-अंश समग्र प्रगती कार्ड विकसित केले गेले आहेत. राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा पातळीवर HPC चा प्रसार सुरू आहे.
- **मोठ्या प्रमाणात संपादणूक सर्वेक्षण -** परखला राष्ट्रीय शालेय शिक्षण प्रणाली आरोग्य तपासणी करण्यासाठी राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS) आणि पायाभूत अध्ययन अभ्यास (FLS) सारख्या मोठ्या प्रमाणात मूल्यांकनांच्या स्वरूपात देशांतर्गत शिक्षण यश पातळीचे वेळोवेळी निरीक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दि. 4 डिसेंबर 2024 रोजी संपूर्ण देशात parakh राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षण करण्यात आले.
- **परीक्षा मंडळांची समतुल्यता -** शालेय परीक्षा मंडळांच्या समतुल्यतेबाबत शिफारसी विकसित करण्यासाठी परख शालेय शिक्षण मंडळांसोबत काम करत आहे. भारतातील सर्व मंडळांमध्ये समतुल्यता आणल्यानंतर, शैक्षणिक, व्यावसायिक किंवा अनुभवात्मक असो, सर्व प्रकारच्या शिक्षणासाठी क्रेडिट पॉइंट्स वाटप करणे शक्य होईल. या उपाययोजनांद्वारे परखने त्यांच्या प्रमुख क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांच्या मूल्यांकनाशी संबंधित निकष,

मानके, मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे आणि उपक्रम राबविण्याचा प्रवास सुरू केला आहे. काळाच्या ओघात, या क्षेत्रांमध्ये मोठा बदल अपेक्षित आहे.

**क्षमता : व्याख्या**

- "ज्ञान, कौशल्ये व वृत्ती यांच्या एकत्रित वापरातून कार्य प्रभावीपणे पार पाडण्याची योग्यता म्हणजे क्षमता." - बेंजामिन ब्लूम (Benjamin Bloom - शिक्षणतज्ज्ञ)
  संदर्भ: Bloom, B. S. Taxonomy of Educational Objectives (१९५६)

- "एखाद्या व्यक्तीकडे असलेली ज्ञान, कौशल्ये, मूल्ये व दृष्टिकोन यांच्या संयोगातून प्राप्त होणारी कृतीयोग्यता म्हणजे क्षमता."- UNESCO - (United Nations Educational, Scientific and Cultural Organization)
  संदर्भ: UNESCO, Competency-Based Curriculum Framework (१९९७, २०१५)

- "आवश्यक संसाधनांचा (ज्ञान, कौशल्ये, दृष्टिकोन) योग्य संदर्भात उपयोग करून वास्तविक जीवनातील कार्य पार पाडण्याची शक्ती म्हणजे क्षमता." - OECD (Organisation for Economic Co-operation and Development)
  संदर्भ: OECD, Definition and Selection of Key Competencies (DeSeCo) (२००३)

- "विद्यार्थ्याने शिकलेल्या ज्ञानाचा कौशल्यांच्या रूपाने प्रत्यक्ष परिस्थितीत प्रभावी उपयोग करण्याची योग्यता म्हणजे Competency." - NCERT दिल्ली
  संदर्भ: NCERT, Learning Outcomes at Elementary Stage (२०१७)

**अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes)**

- अध्ययन निष्पत्ती म्हणजे विद्यार्थ्यांनी अध्ययनाच्या प्रक्रियेनंतर प्राप्त करावयाचे अपेक्षित ज्ञान, कौशल्ये, वर्तन व संकल्पना. NCERT ने प्रत्येक इयत्ता आणि प्रत्येक विषयासाठी अध्ययन निष्पत्ती (LOs) निश्चित केल्या आहेत. शिक्षकांना अध्यापन नियोजन, मूल्यांकन, आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे निरीक्षण यासाठी अध्ययन निष्पत्ती अत्यंत महत्त्वाचे साधन आहे.

**मूल्यमापन (Assessment)**

- व्याख्या : मूल्यमापन म्हणजे विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या पातळीचे, प्रगतीचे आणि कौशल्याचे मापन करण्याची प्रक्रिया. या प्रक्रियेद्वारे विद्यार्थ्याने काय शिकले, कितपत शिकले, आणि कोणत्या बाबतीत सुधारणा आवश्यक आहे हे समजते. मूल्यमापनात चाचण्या, निरीक्षण, प्रकल्प, मौखिक प्रश्नोत्तर, कार्यपत्रिका, कौशल्य चाचणी इत्यादींचा समावेश होतो. मूल्यमापनाचा उद्देश केवळ गुण देणे नसून विद्यार्थी व शिक्षक दोघांच्याही सुधारणा प्रक्रियेला दिशा देणे हा आहे.

## यशोगाथा क्रमांक १
## जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर व शिक्षण विभाग,

**राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS) व कार्यक्षमता प्रतवारी दर्शके (PGI) मध्ये कोल्हापूर जिल्ह्याची संपादणूक सुधारण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर व शिक्षण विभाग, जिल्हा परिषदेने "मिशन उत्कर्ष" हा उपक्रम 2024-25 मध्ये राबविला या उपक्रमाची यशोगाथा खालीलप्रमाणे**

**१. उद्देश**

१. विद्यार्थ्यांच्या संपादणूक पातळीची विषयनिहाय पडताळणी करून त्यामध्ये वाढ करण्यासाठी अतिरिक्त मार्गदर्शन करणे.

२. PGI व NAS निर्देशांक मधील कामगिरी सुधारण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.

३. कोल्हापूर जिल्ह्याच्या PGI गुणांकनामध्ये वाढ करून जिल्हा देशामध्ये पहिल्या स्थानावर आणणे.

## २. चाचणीचे स्वरूप

१. NAS प्रमाणे इयत्ता तिसरी, सहावी व नववी साठी सराव चाचणी

२. तिसरी - प्रथम भाषा, गणित, परिसर अभ्यास ( एकूण 45 गुण)

३. सहावी - प्रथम भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र ( एकूण ६० गुण )

४. नववी - प्रथम भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र ( एकूण ६० गुण )

## ३. चाचण्यांचे विकसन

मूल्यमापन विभाग, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर यांचे मार्फत करण्यात आले.

## ४. शाळा व्यवस्थापन -

१. शासकीय, २. स्थानिक स्वराज्य संस्था, ३. समाज कल्याण विभाग सर्व शाळा, ४.आदिवाशी विभाग सर्व शाळा, ५. खाजगी अनुदानित (अंशतः अनुदानितसह), ६.कायम विनाअनुदानित, ७. स्वयंअर्थसहायीत, ८. सैनिक शाळा, ९. KGBV, १०.नवोदय विद्यालय

## 5. अभ्यासक्रम मंडळ - State Board, CBSC, ICSC

## 6. मासिक सराव चाचणी कालावधी - ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोंबर 2024

## 7. जिल्हा गुणवत्ता कक्ष बैठक व सुकाणू समिती बैठक :

मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर व मा. जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा गुणवत्ता कक्ष बैठक व सुकाणू समिती बैठक दि. 08 ऑगस्ट 2024 रोजी घेण्यात आली. सादर बैठकीमध्ये मिशन उत्कर्ष उपक्रम राबविणेबाबत निश्चित करण्यात आले,



**जिल्हा गुणवत्ता कक्ष बैठक व सुकाणू समिती बैठककीमध्ये राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण 2021 व PGI चे विश्लेषण व पुढील कार्यदिशा ठरविताना.. व मिशन उत्कर्ष अभियान राबविण्याबाबत चर्चा.....**

'मिशन उत्कर्ष' अभियान शाळांत राबविणार

कार्तिकेयन एस. : कोल्हापूर शिक्षणाचे हब बनविणार

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : जिल्हा परिषदेसह सर्वच शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबत आपत्ती व्यवस्थापन, रेन हार्वेस्टिंग, स्वसंरक्षण, परसबाग करण्याचे प्रशिक्षण आणि धडे दिले जाणार आहेत. जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये 'मिशन उत्कर्ष अभियान' राबवून जिल्हा शिक्षणाच्या सर्वच बाबतीत आघाडीवर नेऊन देशात कोल्हापूर हे शिक्षणाचे 'हब' बनवणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी आज दिली. जिल्हा परिषदेमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्राथमिक शिक्षणाधिकारी मीना शेंडकर उपस्थित होत्या.

कार्तिकेयन एस. म्हणाले, 'शिक्षण विभागांतर्गत प्रत्येक वर्षी प्रत्येक शाळांची कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांक निश्चित केला जातो. जिल्हा परिषदेसह इतर शाळांची गुणवत्ता असतानाही अपुरी माहिती भरल्यामुळे जिल्ह्यातील शिक्षण विभागाची श्रेणी कमी झाली आहे. भविष्यात जिल्ह्यातील सर्व शाळांची चांगली व गुणवत्तापूर्ण सर्व माहिती जिल्हा परिषदेमध्येच भरली जाणार आहे. त्यानुसार प्रत्येक शाळेत गुणवत्तेलाही भर दिली जाणार आहे. सातारा जिल्ह्याला ६०० पैकी ४२८ गुण मिळाले आहे; तर दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या मुंबईला ४२४ गुण आहेत. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्याला तिसरा क्रमांक मिळाला आहे. कोल्हापूरला ६०० पैकी ४२२ गुण मिळाले आहेत. ज्यावेळी ही श्रेणी घेतली जाते. त्यावेळी शाळांमध्ये अंगणवाडी, बालवाडी आहे का? हाही मुद्दा द्यावा लागतो. पण, जिल्ह्यात अंगणवाडी व बालवाडीचा मुद्दा भरला नाही. त्यामुळे २० पैकी केवळ चारच गुण मिळाले आहेत. हा मुद्दा व्यवस्थित भरला असता, तर २० पैकी २० गुण मिळाले असते. यामध्ये कोल्हापूर राज्यात प्रथम आला असते. या चुका टाळून नव्याने यावर काम केले जाणार आहे.'

लोकमत

कार्तिकेयन एस. यांची माहिती : जिल्ह्यातील सर्व शाळांचा विचार

कार्यक्षमता निर्देशांकाच्या अव्वल स्थानासाठी 'मिशन उत्कर्ष'

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : देशातील शाळांच्या कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांकात कोल्हापूर जिल्हा देशात सहावा आहे. याची कारणे शोधली असता मोघमात माहिती भरल्याचा फटका जिल्ह्याला बसला आहे. त्यामुळेच यातील बारकावे समजून देशात अव्वल स्थान मिळविण्यासाठी 'मिशन उत्कर्ष' मोहीम हाती घेतल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी दिली.



यावर दिला जाणार भर

शाळांमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग, मान्यवरांच्या शाळांना भेटी, परसबाग, फिट इंडिया नोंदणी, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण आणि स्वसंरक्षण प्रशिक्षण यावर भर देण्यात येणार असून, कोणत्या दिवशी काय करायचे याची दिनदर्शिका करण्यात येणार आहे. पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते १५ ऑगस्टला त्याचे प्रकाशन होणार आहे. निर्दोष आकडेवारी भरली जावी यासाठी ही सर्व आकडेवारी जिल्हा परिषदेतूनच एकत्रितरीत्या भरली जाणार आहे.

जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये नियोजन

जिल्ह्याचा हा प्रतवारी क्रमांक सर्व व्यवस्थापनांच्या आणि सर्व माध्यमांच्या शाळांच्या कामकाजावर ठरत असल्याने या सर्व मोहिमेमध्ये सर्वांना सहभागी करून घेण्यात येत असल्याचे प्राथमिक शिक्षणाधिकारी मीना शेंडकर यांनी सांगितले.

यावेळी प्राथमिक शिक्षणाधिकारी मीना शेंडकर, 'डायट'चे प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र भोई यांच्यासह शिक्षण विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. कार्तिकेयन एस. म्हणाले, देशभरात दरवर्षी परीक्षेद्वारे अध्ययन निष्पत्ती आणि भौतिक, पायाभूत सुविधा, गुणवत्ता, यावर आधारित कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांक निश्चित करण्यात येतो. यासाठी युडायसवरील माहितीचा आधार घेतला जातो. यातील मुद्द्यांच्या आधारे एकूण हे ६०० गुणांचे मूल्यांकन करण्यात येते. यामध्ये बरनाला पंजाब ४६८, फैजापूर ४५७, तारण ४४७ गुण मिळवून पहिले तीन क्रमांकात आले, तर महाराष्ट्रात सातारा ४२८, मुंबई ४२४ आणि कोल्हापूर ४२२ गुणांनी सहाव्या क्रमांकावर आहे.

पिछाडीचे कारण सांगताना कार्तिकेयन म्हणाले, या क्रमवारीमध्ये ४६ गुणांनी कोल्हापूर मागे आहे. याच्या कारणांचा शोध घेतला असताना गुण भरण्याच्या तक्त्यातील काही घटकांचा नेमका अर्थ समजून न घेता गुण भरले गेले. त्यामुळे जिल्हा मागे पडला. त्यामुळेच सर्वेक्षणाआधी याची मुख्याध्यापकांना देण्यात आली. शिक्षकांनाही प्रशिक्षण देण्यात येणार आहे

Hello Kolhapur
Page No. 1 Aug 09, 2024
Powered by: erelego.com

**मिशन उत्कर्ष अभियानाला वर्तमानपत्रामधून दिलेली प्रसिद्धी**

## 8. राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण 2017 व 2021 विश्लेषण

### 2.NAS अहवालानुसार 2017 व 2021 मधील कोल्हापूर जिल्ह्याची सरासरी संपादणूक स्थिती

| Sr.No. | Class | National Average | | State Average | | District Average | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2017 | 2021 | 2017 | 2021 | 2017 | 2021 |
| 1. | Class 3 | 38.4 | 59.0 | 38.6 | 63.4 | 71 | 69.5 |
| 2. | Class 5 | 65.7 | 49.0 | 68.0 | 51.9 | 59 | 54.7 |
| 3. | Class 8 | 56.0 | 41.9 | 56.3 | 42.6 | 46 | 50.8 |
| 4. | Class 10 | 38.4 | 37.8 | 38.6 | 38.3 | | 43.5 |

### NAS २०२१ संपादणूक स्तर टक्केवारी व PGI गुणांकन २०२०-२१

| इयत्ता | विषय | BELOW BASIC | BASIC | PROFICANT | ADVANCE | PROFICANT STUDENTS % + ADVANCE STUDENTS % | PGI निर्देशक | PGI एकूण गुण | PGI प्राप्त गुण कोल्हापूर | PGI प्राप्त गुण बर्नाला (पंजाब) | PGI गुण कसे मिळतात. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरी | भाषा | 12 | 33 | 38 | 18 | 56 | 1.1 साक्षरतेत किमान प्राविण्य मिळवलेल्या इयत्ता ३ री मधील विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | 20 | 11.2 | 16 | PROFICANT STUDENTS % + ADVANCE STUDENTS% * 20 / 100 |
| तिसरी | गणित | 11 | 33 | 35 | 22 | 57 | 1.2 संख्याशास्त्रात किमान प्राविण्य मिळविलेल्या इयत्ता 3 री मधील विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | 20 | 11.4 | 16.4 | |
| पाचवी | भाषा | 12 | 36 | 39 | 13 | 52 | 1.3 साक्षरतेत किमान प्राविण्य मिळवलेल्या इयत्ता 5 वी मधील विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | 20 | 10.4 | 15.2 | |
| पाचवी | गणित | 25 | 46 | 23 | 6 | 29 | 1.4 गणितात संख्याज्ञान पातळीवर किमान प्राविण्य मिळविलेल्या इ. 5 वी मधील विद्यार्थ्यांचे शे. प्रमाण | 20 | 5.8 | 12 | |
| आठवी | भाषा | 4 | 26 | 42 | 28 | 70 | 1.5 साक्षरतेत किमान प्राविण्य मिळवलेल्या इयत्ता 8 वी मधील विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | 15 | 10.5 | 10.65 | PROFICANT STUDENTS % + ADVANCE STUDENTS % * 15 / 100 |
| आठवी | गणित | 16 | 51 | 27 | 5 | 32 | 1.6 गणितात संख्याज्ञान पातळीवर किमान प्राविण्य मिळविलेल्या इ.8 वी मधील विद्यार्थ्यांचे शे. प्रमाण | 15 | 4.8 | 9.15 | |
| आठवी | विज्ञान | 16 | 38 | 32 | 14 | 46 | 1.7 वर्गस्तरावर विज्ञान विषयात किमान प्राविण्य मिळविलेल्या इ. 8 वी मधील विद्यार्थ्यांचे शे. प्रमाण | 15 | 6.9 | 8.85 | |
| आठवी | सामाजिक शास्त्र | 16 | 52 | 22 | 11 | 33 | 1.8 वर्गस्तरावर सा. शास्त्रे विषयात किमान प्राविण्य मिळविलेल्या इ. 8 वी मधील विद्यार्थ्यांचे शे. प्रमाण | 15 | 4.95 | 6.6 | |
| दहावी | इंग्रजी | 23 | 50 | 26 | 1 | 27 | 1.9. आधुनिक भारतीय भाषा (MIL) या विषयात किमान प्राविण्य मिळविलेल्या इ 10 वी मधील विद्यार्थ्यांचे शे. प्रमाण | 10 | 2.7 | 2.9 | PROFICANT STUDENTS % + ADVANCE STUDENTS% * 10 / 100 |
| दहावी | गणित | 22 | 58 | 18 | 2 | 20 | 1.10 गणित या विषयात किमान प्राविण्य मिळविलेल्या इ.10 वी मधील विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | 10 | 2 | 7.4 | |
| दहावी | विज्ञान | 71 | 22 | 6 | 0 | 6 | 1.11 विज्ञान या विषयात किमान प्राविण्य मिळविलेल्या इ.10 वी मधील विद्यार्थ्यांचे शे. प्रमाण | 10 | 0.6 | 3.8 | |
| दहावी | सामाजिक शास्त्र | 39 | 38 | 22 | 2 | 24 | 1.12 सा. शास्त्रे या विषयात किमान प्राविण्य मिळविलेल्या इ. 10 वी मधील विद्यार्थ्यांचे शे. प्रमाण | 10 | 2.4 | 4.5 | |
| एकूण | | 267 | 483 | 330 | 122 | 452 | | 180 | 73.65 | 113.45 | |

कोल्हापूर व बर्नाला फरक 39.8

## 9."मिशन उत्कर्ष"  उपक्रम अंमलबजावणी संभाव्य  नियोजन

| "मिशन उत्कर्ष" उपक्रम अंमलबजावणी संभाव्य नियोजन | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | तपशील | वार व दिनांक | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर यांची जबाबदारी | शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांची जबाबदारी | गट शिक्षणाधिकारी भूमिका | केंद्रप्रमुख भूमिका | मुख्याध्यापक भूमिका | शिक्षक भूमिका |
| १ | सराव चाचणी १ | ऑगस्ट २०२४ | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर यांची जबाबदारी **NAS** चाचणीप्रमाणे इयत्ता तिसरी, सहावी व नववीसाठी सराव चाचणी व **OMR** शीटचे विकसन करणे.<br>चाचणी भाषांतर करणे.<br>चाचणी उत्तर सूची तयार करणे.<br>चाचणीचा पथदर्शी अभ्यास करणे.<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) यांना इयात्तानिहाय चाचणी तयार करून **pdf** स्वरूपात देणे.<br>चाचणीच्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे जिल्हास्तरीय बैठकीमध्ये पुढील कार्यनिती निश्चिती करणे | सराव चाचणी **pdf** स्वरुपात गट शिक्षणाधिकारी यांचेकडे पोहोचविणे.<br>विहित नमुन्यात तयार केलेल्या प्रपत्रकामध्ये तालुकानिहाय माहितीचे संकलन **(MIS C0-ordinator)** यांचेमार्फत करणे.<br>जिल्हा बैठकीमध्ये जिल्ह्याची सांख्यिकी सादरीकरण करणे. | सराव चाचणी **pdf** स्वरुपात स्वरुपात केंद्रप्रमुखापर्यत पोहोचविणे.<br>विहित नमुन्यात तयार केलेल्या प्रपत्रकामध्ये केंद्रनिहाय माहिती संकलन करणे. **(MIS C0-ordinator)** यांचेमार्फत माहिती संकलन करणे.<br>प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना माहिती पाठविणे.<br>जिल्हा बैठकीमध्ये तालुक्याची सांख्यिकी सादरीकरण करणे. | सराव चाचणी **pdf** स्वरुपात शाळांपर्यंत पर्यंत पोहोचविणे.<br>विहित नमुन्यात तयार केलेल्या प्रपत्रकामध्ये गटशिक्षणाधिकारी यांना माहिती पाठविणे.<br>तालुका बैठकीमध्ये केंद्राची सांख्यिकी माहितीचे सादरीकरण करणे | वेळापत्रकानुसार सराव चाचणी संबधित वर्गावर आयोजन करण्यासाठी संबधित इयत्तेच्या शिक्षकांना कळविणे.<br>चाचणीची अंमलबजावणी व मूल्यमापन अचूक करणे.<br>विहित नमुन्यात तयार केलेल्या प्रपत्रकामध्ये माहिती केंद्रप्रमुखाकडे सादर करणे.<br>चाचणी तपासून झाल्यानंतर ज्या प्रश्नाच्या बाबतीत विद्यार्थ्याने चुकीचा प्रतिसाद दिलेला आहे, त्याबाबत संबधित शिक्षकांना अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करणेबाबत सूचना देणे. | वेळापत्रकानुसार सराव चाचणी संबधित वर्गावर आयोजन करण्यासाठी संबधित इयत्तेच्या शिक्षकांना कळविणे.<br>चाचणीची अंमलबजावणी व मूल्यमापन अचूक करणे.<br>विहित नमुन्यात तयार केलेल्या प्रपत्रकामध्ये माहिती केंद्रप्रमुखाकडे सादर करणे.<br>चाचणी तपासून झाल्यानंतर ज्या प्रश्नाच्या बाबतीत विद्यार्थ्याने चुकीचा प्रतिसाद दिलेला आहे, त्याबाबत संबधित शिक्षकांना अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करणेबाबत सूचना देणे. |
| २ | सराव चाचणी २ | सप्टेंबर २०२४ | | | | | | |
| ३ | सराव चाचणी ३ | ऑक्टोंबर २०२४ | | | | | | |

## 11.NAS 2024 पूर्वतयारीसाठी निवडण्यात संबधित इयत्तांचे विषय, प्रश्न संख्या, गुण, माध्यम, अभ्यास मंडळे -

| इयत्ता | विषय | प्रश्न संख्या | प्रश्न क्र. | एकूण गुण | शाळा व्यवस्थापन | माध्यम | अभ्यास मंडळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरी | प्रथम भाषा | १५ | १ ते १५ | ४५ | १.शासकीय शाळा<br>२. स्थानिक स्वराज्य संस्था शाळा<br>३. खाजगी अनुदानित शाळा<br>४. खाजगी विनाअनुदानित<br>५.समाज कल्याण विभाग सर्व शाळा<br>६. आदिवाशी विभाग सर्व शाळा<br>७. कस्तुरभा गांधी बालिका विद्यालय<br>८. नवोदय विद्यालय<br>९. स्वयंअर्थसहाय्यित शाळा | १) मराठी<br>२) सेमी मराठी –इंग्लिश<br>३) उर्दू<br>४) सेमी उर्दू- इंग्लिश<br>५) इंग्रजी | १) राज्य अभ्यास मंडळ<br>२) CBSC<br>३) ICSC |
| | गणित | १५ | १६ ते ३० | | | | |
| | परिसर अभ्यास | १५ | ३१ ते ४५ | | | | |
| सहावी | प्रथम भाषा | १५ | १ ते १५ | ६० | १.शासकीय शाळा<br>२. स्थानिक स्वराज्य संस्था शाळा<br>३. खाजगी अनुदानित शाळा<br>४. खाजगी विनाअनुदानित<br>५.समाज कल्याण विभाग सर्व शाळा<br>६. आदिवाशी विभाग सर्व शाळा<br>७. कस्तुरभा गांधी बालिका विद्यालय<br>८. नवोदय विद्यालय<br>९. स्वयंअर्थसहाय्यित शाळा | १) मराठी<br>२) सेमी मराठी –इंग्लिश<br>३) उर्दू<br>४) सेमी उर्दू- इंग्लिश<br>५) इंग्रजी | १) राज्य अभ्यास मंडळ<br>२) CBSC<br>३) ICSC |
| | गणित | १५ | १६ ते ३० | | | | |
| | विज्ञान | १५ | ३१ ते ४५ | | | | |
| | सामाजिक शास्त्र | १५ | ४६ ते ६० | | | | |
| नववी | प्रथम भाषा | १५ | १ ते १५ | ६० | १.शासकीय शाळा<br>२. स्थानिक स्वराज्य संस्था शाळा<br>३. खाजगी अनुदानित शाळा<br>४. खाजगी विनाअनुदानित<br>५.समाज कल्याण विभाग सर्व शाळा<br>६. आदिवाशी विभाग सर्व शाळा<br>७. कस्तुरभा गांधी बालिका विद्यालय<br>८. नवोदय विद्यालय<br>९. स्वयंअर्थसहाय्यित शाळा | १) मराठी<br>२) सेमी मराठी –इंग्लिश<br>३) उर्दू<br>४) सेमी उर्दू- इंग्लिश<br>५) इंग्रजी | १) राज्य अभ्यास मंडळ<br>२) CBSC<br>३) ICSC |
| | गणित | १५ | १६ ते ३० | | | | |
| | परिसर अभ्यास | १५ | ३१ ते ४५ | | | | |
| | सामाजिक शास्त्र | १५ | ४६ ते ६० | | | | |

## 11.  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर  यांची भूमिका

१. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर  यांची जबाबदारी NAS चाचणीप्रमाणे इयत्ता तिसरी, सहावी व नववीसाठी सराव चाचणी व OMR शीटचे विकसन करणे.
२. चाचणी भाषांतर करणे.
३. चाचणी उत्तर सूची तयार करणे.
४. चाचणीचा पथदर्शी अभ्यास करणे
५. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) यांना  इयात्तानिहाय चाचणी तयार करून pdf स्वरूपात देणे.
६. चाचणीच्या सांख्यिकीय माहितीच्या  आधारे  जिल्हास्तरीय बैठकीमध्ये  पुढील कार्यनिती निश्चिती करणे.

## 12. शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांची जबाबदारी

१. सराव चाचणी pdf स्वरुपात गट शिक्षणाधिकारी यांचेकडे पोहोचविणे.
२. विहित नमुन्यात तयार केलेल्या प्रपत्रकामध्ये तालुकानिहाय माहितीचे संकलन (MIS Coordinator) यांचेमार्फत करणे.
३. जिल्हा बैठकीमध्ये जिल्ह्याची सांख्यिकी सादरीकरण करणे.

## 13. गट शिक्षणाधिकारी यांची भूमिका

१. सराव चाचणी pdf स्वरुपात केंद्रप्रमुखापर्यंत पोहोचविणे.
२. विहित नमुन्यात तयार केलेल्या प्रपत्रकामध्ये केंद्रनिहाय माहिती संकलन करणे. (MIS Co-Coordinator) यांचेमार्फत माहिती संकलन करणे.
३. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना माहिती पाठविणे.
४. जिल्हा बैठकीमध्ये तालुक्याची सांख्यिकी सादरीकरण करणे.

## १४. केंद्रप्रमुख यांची भूमिका

१. सराव चाचणी pdf स्वरुपात शाळांपर्यंत पर्यंत पोहोचविणे.
२. विहित नमुन्यात तयार केलेल्या प्रपत्रकामध्ये गटशिक्षणाधिकारी यांना माहिती पाठविणे.
३. तालुका बैठकीमध्ये केंद्राची सांख्यिकी माहितीचे सादरीकरण करणे

## १५. मुख्याध्यापक यांची भूमिका

१. वेळापत्रकानुसार सराव चाचणी संबधित वर्गावर आयोजन करण्यासाठी संबधित इयत्तेच्या शिक्षकांना कळविणे.
२. चाचणीची अंमलबजावणी व मूल्यमापन अचूक करणे.
३. विहित नमुन्यात तयार केलेल्या प्रपत्रकामध्ये माहिती केंद्रप्रमुखाकडे सादर करणे.
४. चाचणी तपासून झाल्यानंतर ज्या प्रश्नाच्या बाबतीत विद्यार्थ्याने चुकीचा प्रतिसाद दिलेला आहे, त्याबाबत संबधित शिक्षकांना अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करणेबाबत सूचना देणे.

## १६. शिक्षक यांची भूमिका

१. वेळापत्रकानुसार सराव चाचणी संबधित इयत्तेच्या वर्गावर घेणे.
२. OMR शीट तपासणी करणे.
३. विहित नमुन्यात तयार केलेल्या प्रपत्रामध्ये मुख्याध्यापक यांना चाचणीचे गुणपत्रक सादर करणे.
४. ज्या अध्ययन निष्पत्तीमध्ये अथवा प्रश्नांमध्ये कमी गुण मिळालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करणे.

कोल्हापूर जिल्हा देशामध्ये पहिल्या स्थानावर आणावयाचा होता. यासाठी सहा महिन्याचा कृतिबद्ध शैक्षणिक उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली. यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद तसेच सरकारी, खासगी अनुदानित आणि खासगी विनाअनुदानित अशा सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये हा उपक्रम सुरू केला. कोल्हापूर जिल्हा देशात प्रथम येण्यासाठी शिक्षण विभाग जिल्हा परिषद, डायट कोल्हापूर जिल्हा यांच्या प्रयत्नातून मिशन उत्कर्ष अभियान नियोजनबद्धरित्या राबविण्यात आला.

१. शिक्षण विभाग अंतर्गत दरवर्षी प्रत्येक शाळेची PGI प्रतवारी निश्चित केली जाते त्याचे विश्लेषण केले.
२. यामध्ये भौतिक व पायाभूत सुविधा, गुणवत्ता, अध्ययन निष्पती याप्रमाणे एकूण सहा श्रेणीनिहाय गुणांकन होते. यासाठी शाळांनी भरलेल्या युडायस माहितीचा आधार घेतला जातो. यामध्ये शाळांतील विद्यार्थ्यांची उपस्थिती, विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर, पर्यवेक्षीय यंत्रणेच्या शाळा भेटींची संख्या, दिव्यांगासाठी उपलब्ध सुविधा, रेनवॉटर हार्वेस्टिंग, विज्ञान प्रयोगशाळा, किचन गार्डन, कम्प्युटर व

इंटरनेट सुविधा याद्वारे एकूण 600 गुणांचे मूल्यांकन होते त्यानुसार ज्या निकषामध्ये गुणांकन कमी झालेले आहे अशा निकषावर काम करण्यास सुरवात केली.

३. शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेमार्फत तालुकानिहाय कार्यशाळा घेऊन युडायस प्रणालीवर माहिती कशी अचूक भरायची याबाबत उद्बोधन करण्यात आले.
४. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर यांचेमार्फत तिसरी. सहावी व नववीसाठी विषयनिहाय व अध्ययन निष्पत्ती निहाय मराठी , उर्दू व इंग्रजी माध्यमातून प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका तयार करण्यात आल्या.
५. प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे मार्फत तपासून घेण्यात आल्या.
६. जिल्हा परिषदेमार्फत प्रश्नपत्रिका नव उत्तरपत्रिका छपाई करून विद्यार्थ्यांना सरावासाठी देण्यात आल्या.
७. काही सराव चाचण्या ज्ञानप्रकाश फौंडेशन, पुणे यांच्या ऑनलाइन पोर्टलवरून विद्यार्थ्यांकडून सोडवून घेण्यात आल्या.

### १६. मिशन उत्कर्ष अभियान दिनदर्शिका, आवश्यक संदर्भ पत्रे, pdf इत्यादीची लिंक

https://drive.google.com/drive/folders/१९९६a४N५ZbvRNMXXhq_२wurgz-XKnyKsF?usp=sharing




**मिशन उत्कर्ष अभियान दिनदर्शिका मासिक नमुना**

**मिशन उत्कर्ष अभियान अंतर्गत NAS चाचणी अंमलबजावणी काही क्षण चित्रे**









## १७. जिल्हास्तर ऑनलाइन शिक्षण परिषद: मिशन उत्कर्ष अभियान -

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली **जिल्हास्तरीय शिक्षण परिषद घेण्यात आली. यामध्ये मिशन उत्कर्ष अभियानाची अंमलबजावणी कशी करायची याबाबत मार्गदर्शन केले.**





## 18. परख सर्वेक्षणात कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्रात अव्वल

शिक्षण क्षेत्रात सातत्याने अनेक सर्वेक्षणे होत असतात. यामध्ये प्रामुख्याने शासकीय संस्था, स्वयंसेवी संस्था यांचेकडून सर्वेक्षण केले जाते. देशपातळीवर NCERT ही संस्था शिक्षण क्षेत्रात सर्वेक्षण करते. या संस्थाच्या सर्वेक्षणातून देशाची शिक्षणविषयक सद्यस्थिती समोर येत असते.

NCERT, नवी दिल्ली यांचे मार्फत दर 3 वर्षांनी प्राथमिक व माध्यमिक स्तरावर देशपातळीवर सर्वेक्षण करते. याला राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (National Achievement Survey) म्हणतात. सदर संस्थेने

2017 व 2021 या शैक्षणिक वर्षात इयत्ता 3 री, 5 वी, 8 वी व 10 वी च्या संपादणूकीचे सर्वेक्षण केले होते. ही संस्था यादृच्छिक पद्धतीने सर्व राज्यातील, सर्व जिल्ह्यातील, सर्व तालुक्यातील शाळा व विद्यार्थ्यांची निवड करून संपादणूकीचे सर्वेक्षण करते.

PARAKH (Performance Assessment, Review and Analysis of Knowledge for Holistic Development) ही संस्था, NCERT अंतर्गत राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र (National Assessment Centre) म्हणून NEP २०२० (National Education Policy २०२०) नुसार स्थापन करण्यात आली आहे. PARAKH या संस्थेने दि. 4 डिसेंबर २०२४ रोजी देशपातळीवर राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षण केले. सदर सर्वेक्षणामध्ये नमुनाधारित शाळा व विद्यार्थी यांची निवड करून इयत्ता तिसरी, सहावी व नववीच्या विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण केले. महाराष्ट्र राज्यातील ४३१४ शाळा, १३९३० शिक्षक आणि १,२३,६५९ विद्यार्थ्यांनी या सर्वेक्षणात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांचे मूल्यांकन इयत्ता ३ री , ६ वी आणि ९ वी मध्ये भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र आणि 'The World Around Us/परिसर अभ्यास या विषयांसाठी घेण्यात आले. कोल्हापूर जिल्ह्यातील या सर्वेक्षणात सहभागी शाळा संख्या एकूण 127 (तिसरी 29, सहावी 42, नववी 46), शिक्षक सहभाग एकूण 353 (तिसरी 64, सहावी 107, नववी 182), विद्यार्थी सहभाग एकूण 3218 (तिसरी 1010, सहावी 1002, नववी 1206) असा होता.

## 19. परख- राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षण 2024 उद्दिष्टे

१. विद्यार्थ्यांच्या इयत्ता व विषयनिहाय अध्ययन संपादणूकीचे मूल्यांकन करणे.
२. विषयातील निवड क्षमतानिहाय, क्षेत्रनिहाय, लिंगनिहाय, व्यवस्थापननिहाय व सामाजिक संवर्ग निहाय विद्यार्थी अध्ययन संपादणूकीचे मूल्यांकन करणे.
३. केंद्र व राज्य सरकारांना व शैक्षणिक संस्थाना, शैक्षणिक धोरण ठरविण्यासाठी व नियोजनासाठी आधारभूत विदा (डेटा ) उपलब्ध करून देणे.
४. कार्यक्षमता प्रतवारी दर्शके (PGI) अहवालासाठी आवश्यक माहिती तयार करणे.

## 20. परख -राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षण 2024 नुसार कोल्हापूर जिल्हा, महाराष्ट्र राज्य व देश यांचे स्थान

१. कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्रामध्ये इयत्ता 3 री, 6 वी व 9 वी मध्ये सर्व विषयात विद्यार्थी अध्ययन संपादणूकीमध्ये प्रथम स्थानावर आहे.
२. कोल्हापूर जिल्हा देशामध्ये जिल्ह्यांच्या क्रमवारीमध्ये विद्यार्थी अध्ययन संपादणूकीमध्ये इयत्ता 3 री मध्ये 26 व्या स्थानावर, इयत्ता 6 वी मध्ये 7 व्या स्थानावर व इयत्ता 9 वी मध्ये 14 व्या स्थानावर आहे
३. महाराष्ट्र राज्य सरासरी विद्यार्थी अध्ययन संपादणूकीमध्ये देशात 8 व्या स्थानावर आहे.
४. इयत्ता तिसरीमध्ये विद्यार्थी अध्ययन संपादणूकीमध्ये महाराष्ट्र 6 व्या स्थानावर तर पंजाब 1 ल्या स्थानावर आहे.
५. इयत्ता सहावीमध्ये विद्यार्थी अध्ययन संपादणूकीमध्ये महाराष्ट्र 7 व्या स्थानावर तर केरळ 1 ल्या स्थानावर आहे.
६. इयत्ता नववीमध्ये विद्यार्थी अध्ययन संपादणूकीमध्ये महाराष्ट्र 10 व्या स्थानावर तर पंजाब 1 ल्या स्थानावर आहे.
७. इयत्ता ९ वी - सर्वोत्तम संपादणूक जिल्हे: कोल्हापूर, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मुंबई.

## 21. देशपातळीवर सर्वोत्तम अध्ययन संपादणूक प्राप्त करणारे महाराष्ट्रातील जिल्हे (पहिले ५०)

१. इयत्ता ३ री - सर्वोत्तम संपादणूक जिल्हे: कोल्हापूर (२६ व्या स्थानावर ), सोलापूर (40 व्या स्थानावर)

२. इयत्ता ६ वी - सर्वोत्तम संपादणूक जिल्हे: कोल्हापूर (10 व्या स्थानावर ), मुंबई (45 व्या स्थानावर)

३. इयत्ता 9 वी - सर्वोत्तम संपादणूक जिल्हे: कोल्हापूर (14 व्या स्थानावर ), सातारा (३७ व्या क्रमांकावर) रत्नागिरी (41व्या स्थानावर,सिंधुदुर्ग (42 व्या स्थानावर , मुंबई (शहर )(50 व्या स्थानावर)

## 22. विद्यार्थी संपादणूक NAS २०१७, NAS २०२१ & PARAKH २०२४ अहवाल सांख्यिकी (सर्व आकडेवारी टक्केवारी मध्ये आहे)

| इयत्ता | विषय | NAS २०१७ | | | NAS २०२१ | | | PARAKH २०२४ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भारत देश | महाराष्ट्र राज्य | कोल्हापूर जिल्हा | भारत देश | महाराष्ट्र राज्य | कोल्हापूर जिल्हा | भारत देश | महाराष्ट्र राज्य | कोल्हापूर जिल्हा |
| तिसरी | भाषा | ६८ | ७० | ७१ | ६२ | ६७ | ७४ | ६४ | ६९ | ८२ |
| तिसरी | गणित | ६४ | ६५ | ६८ | ५७ | ६१ | ६६ | ६१ | ६४ | ७७ |
| पाचवी / सहावी | भाषा | ५८ | ६१ | ६४ | ५५ | ५९ | ६२ | ५७ | ६२ | ८० |
| पाचवी / सहावी | गणित | ५८ | 61 | ५४ | ४४ | ४५ | ४८ | ४६ | ५१ | ७० |
| पाचवी / सहावी | EVS/TWAS | ५७ | ५६ | ५८ | ४८ | ५१ | ५४ | ४९ | ५५ | ७३ |
| आठवी / नववी | भाषा | ५७ | ६३ | ६८ | ५३ | ५७ | ७० | ५४ | ५९ | ७९ |
| आठवी / नववी | गणित | ४२ | ४० | ३८ | ३४ | ३६ | ३९ | ३७ | ३८ | ५३ |
| आठवी / नववी | विज्ञान | ४४ | ४० | ३८ | ३९ | ३९ | ४८ | ४० | ४२ | ५५ |
| आठवी / नववी | सामाजिक | ४४ | ४२ | ३९ | ३९ | ४० | ४७ | ४० | ४३ | ५७ |

**PARAKH राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षण २०२४ अहवालानुसार इयत्ता व विषयनिहाय राष्ट्रीय, महाराष्ट्र व कोल्हापूर जिल्हा विद्यार्थी अध्ययन संपादणूक आलेख**




23. इयत्तानिहाय व विषय कामगिरी

- इयत्ता ३ री विद्यार्थी अध्ययन संपादणूक
  - भाषा - कोल्हापूर : ८२% । राज्य सरासरी: ६९% । राष्ट्रीय सरासरी: ६४%
  - गणित - कोल्हापूर : ७७% । राज्य सरासरी: ६४% । राष्ट्रीय सरासरी: ६१%
- इयत्ता 6 वी विद्यार्थी अध्ययन संपादणूक
  - भाषा - कोल्हापूर : ८०% । राज्य सरासरी: ६२% । राष्ट्रीय सरासरी: ५७%
  - गणित - कोल्हापूर : ७०% । राज्य सरासरी: ५१% । राष्ट्रीय सरासरी: ४६%
  - आपल्या सभोवतालचे जग- कोल्हापूर : ७३% । राज्य सरासरी: ५५% । राष्ट्रीय सरासरी: ४९%
- इयत्ता 9 वी विद्यार्थी अध्ययन संपादणूक
  - भाषा - कोल्हापूर : ७९% । राज्य सरासरी: ५९% । राष्ट्रीय सरासरी: ५४%
  - गणित- कोल्हापूर : ५३% । राज्य सरासरी: ३८% । राष्ट्रीय सरासरी: ३७%
  - विज्ञान - कोल्हापूर : ५५% । राज्य सरासरी: ४२% । राष्ट्रीय सरासरी: ४०%
  - सामाजिक शास्त्र - कोल्हापूर : ५७% । राज्य सरासरी: ४३% । राष्ट्रीय सरासरी: ४०%

24. कोल्हापूर जिल्हा इयत्ता ३ री चे निष्कर्ष :

१. भाषा विषयात कोल्हापूर जिल्ह्याची सरासरी अध्ययन संपादणूक ८२ % तर महाराष्ट्र राज्य सरासरी ६९% असून राज्य सरासरीपेक्षा 13% अधिक आहे. तर राष्ट्रीय सरासरी (64%) पेक्षा १८ %ने अधिक आहे.
२. गणित विषयात कोल्हापूर जिल्ह्याची सरासरी अध्ययन संपादणूक 77 % तर महाराष्ट्र राज्य सरासरी 64% असून राज्य सरासरीपेक्षा 13% अधिक आहे. तर राष्ट्रीय सरासरी (60%) पेक्षा १7%ने अधिक आहे.कोल्हापूर जिल्हा हा महाराष्ट्रामध्ये इयत्ता ३ मध्ये सर्वोच्च कामगिरी करणारा जिल्हा ठरलेला आहे.
३. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळामध्ये इतर शाळांच्या तुलनेत अध्ययन संपादणूक अधिक आहे.
४. मुलांच्या तुलनेत मुली थोड्याशा अध्ययन संपादणूकीमध्ये पुढे आहेत.
५. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची अध्ययन संपादणूक शहरी भागापेक्षा थोडीशी अधिक आहे.

## 25. कोल्हापूर जिल्हा इयत्ता 6 वी चे निष्कर्ष:

१. भाषा विषयात कोल्हापूर जिल्ह्याची सरासरी अध्ययन संपादणूक ८0 % तर महाराष्ट्र राज्य सरासरी ६2% असून राज्य सरासरीपेक्षा 18% अधिक आहे. तर राष्ट्रीय सरासरी (57%) पेक्षा 23 %ने अधिक आहे.
२. गणित विषयात कोल्हापूर जिल्ह्याची सरासरी अध्ययन संपादणूक 70% तर महाराष्ट्र राज्य सरासरी 51% असून राज्य सरासरीपेक्षा 19% अधिक आहे. तर राष्ट्रीय सरासरी (46%) पेक्षा 24 %ने अधिक आहे.
३. The World Around Us (TWAU) या विषयात कोल्हापूर जिल्ह्याची सरासरी अध्ययन संपादणूक 73% तर महाराष्ट्र राज्य सरासरी 55% असून राज्य सरासरीपेक्षा 18% ने अधिक आहे. तर राष्ट्रीय सरासरी (49%) पेक्षा 24 %ने अधिक आहे.
४. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळामध्ये इतर शाळांच्या तुलनेत अध्ययन संपादणूकीमध्ये फरक दिसून येत नाही.
५. मुलांच्या तुलनेत मुली थोड्याशा अध्ययन संपादणूकीमध्ये पुढे आहेत.
६. शहरी भागातील विद्यार्थ्यांची अध्ययन संपादणूक ग्रामीण भागापेक्षा थोडीशी अधिक आहे.

## 26. कोल्हापूर जिल्हा इयत्ता 9 वी चे निष्कर्ष :-

१. भाषा विषयात कोल्हापूर जिल्ह्याची सरासरी अध्ययन संपादणूक 79 % तर महाराष्ट्र राज्य सरासरी 59% असून राज्य सरासरीपेक्षा 24% अधिक आहे. तर राष्ट्रीय सरासरी (54%) पेक्षा 25%ने अधिक आहे.
२. गणित विषयात कोल्हापूर जिल्ह्याची सरासरी अध्ययन संपादणूक ५३% तर महाराष्ट्र राज्य सरासरी ३८% असून राज्य सरासरीपेक्षा 1५% अधिक आहे. तर राष्ट्रीय सरासरी (३७%) पेक्षा १६ %ने अधिक आहे.
३. विज्ञान विषयात कोल्हापूर जिल्ह्याची सरासरी अध्ययन संपादणूक ५5% तर महाराष्ट्र राज्य सरासरी 42% असून राज्य सरासरीपेक्षा १३ % अधिक आहे. तर राष्ट्रीय सरासरी (४०%) पेक्षा 15 %ने अधिक आहे.
४. सामाजिक शास्त्र विषयात कोल्हापूर जिल्ह्याची सरासरी अध्ययन संपादणूक ५7% तर महाराष्ट्र राज्य सरासरी 43% असून राज्य सरासरीपेक्षा १2 % अधिक आहे. तर राष्ट्रीय सरासरी (४०%) पेक्षा 15 %ने अधिक आहे.

५. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तुलनेत खाजगी अनुदानित संस्थाच्या शाळामधील अध्ययन संपादणूक थोडीशी अधिक आहे.
६. मुलांच्या तुलनेत मुली थोड्याशा अध्ययन संपादणूकीमध्ये पुढे आहेत.
७. शहरी भागातील विद्यार्थ्यांची अध्ययन संपादणूक ग्रामीण भागापेक्षा थोडीशी अधिक आहे.

## 27. राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण 2021 व परख राष्ट्रीय सर्वेक्षण 2024 तुलना : कोल्हापूर

1. **इयत्ता ३ री - भाषा:** 74% (2021) । ८२% (2024) 08 % **वाढ**
2. **इयत्ता ३ री - गणित :** 66% (2021) । 77% (2024) 11 % **वाढ**
3. **इयत्ता 6 वी - भाषा :** 62% (2021) । 80% (2024) १८% **वाढ**
4. **इयत्ता 6 वी - गणित :** 48% (2024) । 70% (2024) 22% **वाढ**
5. **इयत्ता 6 वी - प. अभ्यास :** 54% (2021) । 73 % (2024) 19 % **वाढ**
6. **इयत्ता 9 वी - भाषा :** 70% (2021) । 79 % (2024) 09 % **वाढ**
7. **इयत्ता 9 वी - गणित :** 39% (2021) । 53 % (2024) 14 % **वाढ**
8. **इयत्ता 9 वी - विज्ञान :** 48% (2021) । 55 % (2024) 07 % **वाढ**
9. **इयत्ता 9 वी - सा.शास्त्र :** 47 % (2021) । 57 % (2024) 10% **वाढ**

राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS) 2021 व परख राष्ट्रीय सर्वेक्षण (PRS) 2024 ची तुलना करता विद्यार्थी सरासरी अध्ययन संपादणूकमध्ये 13.12 टक्केने कोल्हापूर जिल्ह्याची वाढ झालेली पहावयास मिळते. तसेच इयत्ता तिसरी, सहावी व नववीच्या सर्वेक्षण करण्यात आलेल्या सर्व विषयामध्ये कोल्हापूरचे विद्यार्थी सरासरी अध्ययन संपादणूकीमध्ये अव्वल ठरलेले आहेत, त्यामुळे "कोल्हापूरची पोर हुशार! असे म्हणावेसे वाटते.

## 28. मिशन उत्कर्ष अभियानाचे अभूतपूर्व यश:-

कोल्हापूर जिल्ह्याचे मा. जिल्हाधिकारी, अमोल येडगे व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्तिकेयन स. यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाखाली मिशन उत्कर्ष हे अभियान 2024-25 मध्ये राबविण्यात आले. यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), कोल्हापूर आणि प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर याच्या संयुक्त विद्यमाने सदर अभियानाची प्रभावी अंमलबजावणी शाळास्तरावर करण्यात आली.

## 29. मिशन उत्कर्ष अभियान फायदा -

1. विद्यार्थ्यांचे अध्ययन निष्पत्ती (Learning outcomes) मधील संपादणूक मोठ्या प्रमाणात सुधारली.
2. PARAKH राष्ट्रीय सर्वेक्षणात कोल्हापूरला महाराष्ट्रात पहिले स्थान मिळाले.
3. Performance Grading Index (PGI) 2023-२४ मध्ये जिल्ह्याने ३४५ गुण मिळवून Prachesta-I श्रेणीत स्थान मिळवले. व महाराष्ट्रात गुणांकनामध्ये 1 क्रमांकाचा जिल्हा ठरला.
4. Performance Grading Index (PGI) 20२४-25 मध्ये जिल्ह्याने 463 गुण मिळवून Uttam 2 श्रेणीत स्थान मिळवले. व महाराष्ट्रात व देशात गुणांकनामध्ये 1 क्रमांकाचा जिल्हा ठरला.

5. भौतिक सुविधा सुधारणा झाल्या. यामध्ये शाळांमध्ये स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, दिव्यांग रॅम्प, इमारतींची दुरुस्ती, परसबाग निर्मिती, Rain Water Harvesting यासारख्या मूलभूत सुविधा यामध्ये सुधारणा झाल्या.मुलांना शिकण्यासाठी सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण मिळाले.

   एकंदरीत कोल्हापूर जिल्ह्याला असलेली गुणवत्तेची परंपरा आणखी उंचावण्यासाठी मिशन उत्कर्ष अभियान फलदायी ठरले.

शासनाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाच्या 2024-25 च्या शैक्षणिक कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांकात कोल्हापूर जिल्ह्याने 600 पैकी 463 गुण मिळवून देशात प्रथम क्रमांक पटकावला. पंजाबमधील बर्नाला जिल्हा 461 गुण मिळवून देशात दुसऱ्या, तर पंजाबमधीलच मुक्तसार जिल्हा 456 गुण मिळवून तिसऱ्या स्थानावर आला आहे. युडायस प्लस माहिती, राष्ट्रीय संपादणूक पातळी आणि इतर शैक्षणिक माहिती अशा 72 निकषांच्या आधारे 600 गुणांचे गुणांकन करण्यात येते. त्याच्या आधारे निर्देशांकातील स्थान निश्चित करण्यात येते. 2023-24 मध्ये कोल्हापूर जिल्ह्याला या निर्देशांकात 345 गुण मिळाले होते.

**यशोगाथा क्रमांक २**

# विद्या मंदिर नृसिंहवाडीची यशोगाथा

मिशन उत्कर्ष अभियान – शैक्षणिक संपादणूक वाढीचा प्रवास

**सौ सुवर्णा सुनील माने .मुख्याध्यापक**
**सौ. रुपाली संदीप शेळके, अध्यापिका,**
**विद्या मंदिर नृसिंहवाडी , तालुका शिरोळ**

शिक्षण हेच परिवर्तनाचे माध्यम आहे हे ब्रीदवाक्य समोर ठेवून, कोल्हापूर जिल्ह्याचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी आणि **PGI (Performance Grading Index)** मध्ये जिल्ह्याला अव्वल स्थानी नेण्यासाठी **मा. अमोल येडगे (जिल्हाधिकारी, कोल्हापूर)** आणि **मा. कार्तिकेयन एस. (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. कोल्हापूर)** यांच्या प्रेरणेतून 'मिशन उत्कर्ष' अभियान सुरू झाले. **'डाएट'चे तत्कालीन प्राचार्य डॉ. राजेंद्र भोई, प्राथमिक शिक्षणाधिकारी सौ. मीना शेंडकर** आणि **माध्यमिक शिक्षणाधिकारी, डॉ.एकनाथ आंबोकर** यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक केंद्रातर्गत जिल्हास्तरावरून ऑनलाईन शिक्षण परिषदे मधून मिशन उत्कर्ष कार्यवाही कशी करायची याबाबत मार्गदर्शन करण्यात आले यातून प्रेरणा घेत विद्या मंदिर नृसिंहवाडी (जिल्हा परिषद शाळा) शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांना मिशन उत्कर्षची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याची निर्धार केला.

**उद्दिष्ट्ये -**

१. इयत्ता 1 ते 7 वीतील विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीत वाढ होण्यासाठी नियोजन करणे.
२. NAS व PGI निर्देशांकात शाळेची कामगिरी सुधारून जिल्ह्याच्या गुणवत्तावाढीस हातभार लावण्यासाठी कृती करणे.
३. प्रत्येक विद्यार्थ्याला Proficient व Advance स्तरावर आणण्यासाठी कृती करणे.

४. पालकांचा सहभाग वाढवून शाळा-घर यामध्ये शैक्षणिक समन्वय साधण्यासाठी कृती करणे.

### कार्यवाही (इयत्ता १ ते ७ वी साठी राबविलेले उपक्रम) -

मा.मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात बैठक घेण्यात आली. PGI मधील आवश्यक निकष पूर्तता करण्यासाठी मिशन उत्कर्ष अभियान कसे महत्वाचे आहे हे त्यांनी बैठक घेऊन पटवून दिलेले. UDISE डेटा अचूक कसा भरला जाईल, **स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, दिव्यांग रॅम्प, इमारतींची दुरुस्ती, परसबाग निर्मिती, Rain Water Harvesting यासारख्या मूलभूत सुविधा चांगल्या पद्धत्तीने उपलब्ध करता येईल यासाठी प्रयत्न करावयाचे ठरले प्रत्येकाने जबाबदाऱ्या वाटून घेतल्या.**

### १. ऑनलाइन सराव चाचण्या (इ. २ री ते ७वी )

१. विद्यार्थ्यांनी मोबाईल व संगणकाच्या माध्यमातून प्रश्नपत्रिका सोडविल्या.
२. पालकांनी तांत्रिक मदत करून विद्यार्थ्यांना चाचणी पूर्ण करण्यास सहाय्य केले.



( विद्यार्थी संगणकावर वर सराव चाचणी देताना)

### २. ऑफलाइन सराव चाचण्या (इ. ३ , ६ व ७ वी ) -

१. पेपर-पेन्सिल स्वरूपात सराव परीक्षा घेण्यात आली.
२. प्रश्नपत्रिका तपासून निकाल ऑनलाइन नोंदविण्यात आला.
३. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.



(वर्गात परीक्षा देताना विद्यार्थी )

### ३. शिक्षक प्रशिक्षण व मार्गदर्शन

१. गटशिक्षणाधिकारी व डायट कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी अध्यापन पद्धतीत सुधारणा केली.
२. विषयानुसार अध्यापन नियोजन व विद्यार्थ्यांच्या अडचणींवर उपाययोजना.




### ४. डेटा विश्लेषण व कृती आराखडा –

विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीचा बारकाईने अभ्यास केला. प्रत्येक इयत्तेतील सराव चाचण्यांचे निकाल संकलित करून त्याचे विश्लेषण करण्यात आले.

१. सराव चाचण्यांचे निकाल तपासून विद्यार्थ्यांच्या अडचणी ओळखल्या.
२. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी कृती आराखडा तयार करून वैयक्तिक मार्गदर्शन.

### कृती आराखड्याचे घटक  पुढीलप्रमाणे

१. **वैयक्तिक मार्गदर्शन**- प्रत्येक विद्यार्थ्याच्या अडचणी लक्षात घेऊन वैयक्तिक पातळीवर मदत केली.
२. **अभ्यास नियोजन** - विषयानुसार आठवड्याचे अभ्यास नियोजन तयार करून त्यानुसार अध्यापन केले.
३. **पुनरावृत्ती सत्र** - अडचणीच्या घटकांवर विशेष पुनरावृत्ती सत्रांचे आयोजन करण्यात आले.
४. **पालक संवाद** - पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीची माहिती देऊन घरात अभ्यासासाठी सहकार्य मिळवून पालकांची मदत घेतली.
५. **प्रगती नोंदवही** - प्रत्येक विद्यार्थ्याची प्रगती नोंदवहीत टिपून नियमित परीक्षण



**(शिक्षक व केंद्रप्रमुख निकालांचे विश्लेषण करताना)**

### ५. पालकांचा सहभाग -

१. पालकांनी मुलांना मोबाईलवर चाचणी सोडवताना मदत केली.
२. शाळा-घर यामध्ये शैक्षणिक समन्वय साधण्याचे प्रयत्न करण्यात आले.

 

(पालक मुलांना मदत करताना)

### 6. मुख्याध्यापक भूमिका :

1. शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी मिशन उत्कर्ष या उपक्रमाची माहिती सर्व शिक्षकांची बैठक घेऊन दिली.
2. मिशन उत्कर्ष उपक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या चाचण्या, त्यांचे स्वरूप, वेळापत्रक यांची माहिती दिली.
3. मिशन उत्कर्ष उपक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या चाचण्याच्या अनुषंगाने असणारा अभ्यासक्रम, पाठ्यक्रम पूर्ण करण्यास सांगितले.
4. मिशन उत्कर्ष उपक्रमांतर्गत देण्यात आलेल्या दिनदर्शिकाप्रमाणे UDISE माहिती अचूक व वेळेवर भरणे याबाबत सर्व शिक्षकांना अवगत केले. तसेच येणाऱ्या अडचणीबाबत यथावकाश मार्गदर्शन केले.
5. शाळांमध्ये स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, दिव्यांग रॅम्प, इमारतींची दुरुस्ती,परसबाग उपक्रम, Rain Water harvesting , अद्यावत संगणक कक्ष, स्पर्धा परीक्षा इत्यादी उपक्रमांची मुख्याध्यापक यांनी योग्यप्रकारे अंमलबजावणी केली.

### 7. पुरस्कार व प्रोत्साहन -

1. विविध स्पर्धा परीक्षा सराव चाचण्या मध्ये उत्कृष्ट आणि उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे, शिष्यवृत्ती व गौरव देऊन प्रेरित केले.

 

**( विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन प्रोत्साहन )**

2. **क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम** - तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम व विज्ञान प्रदर्शनात सहभाग.





**केंद्र शेडशाळ आणि जिल्हास्तरीय क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धेत यश मिळवणारे विद्यार्थी**

## 8. सांख्यिकीय आकडेवारी (इ. ३ ते ७ वी विद्यार्थ्यांची प्रगती )

| इयत्ता | विषय | Basic स्तर % | Proficient स्तर % | Advance स्तर % | एकूण प्राविण्य % |
|---|---|---|---|---|---|
| ३ री | भाषा | ३३% | ३८% | १८% | ५६% |
| ३ री | गणित | ३३% | ३५% | २२% | ५७% |
| ५ वी | भाषा | ३६% | ३९% | १३% | ५२% |
| ५ वी | गणित | ४६% | २३% | ६% | २९% |
| ६ वी | भाषा/गणित/विज्ञान | ४०% | ४२% | १८% | ६०% |
| ७ वी | भाषा/गणित/विज्ञान/समाजशास्त्र | ३८% | ४५% | १७% | ६२% |

## 9. निष्कर्ष –

१. विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादन वाढ लक्षणीयरीत्या वाढ झाली.
२. Basic स्तरावरील विद्यार्थी आता Proficient व Advance स्तरावर पोहोचले.
३. विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची उत्सुकता वाढली.
४. शिक्षकांनी नव्या अध्यापन पद्धती स्विकारल्या.
५. पालकांचा सहभाग वाढून शाळेचे शैक्षणिक संपादन वाढले.
६. शाळेने जिल्ह्याच्या PGI गुणांकणात भर घालून आदर्श निर्माण केला.

शाळेला भेट देणाऱ्या केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी आणि 'डाएट'च्या अधिकाऱ्यांनी शाळेच्या माहिती आधारित प्रगती (Data-driven growth) प्रणालीचे विशेष मार्गदर्शन आणि कौतुक केले. या यशोगाथेमुळे ही शाळा गुणवत्तेमध्ये अग्रेसर ठरली आहे. स्पर्धा परीक्षा मधील नवोदय, शिष्यवृत्ती किंवा इतर स्पर्धा परीक्षेत शाळेच्या विद्यार्थ्यांना यश मिळाले तसेच क्रीडा आणि कलामध्ये केवळ अभ्यासच नाही, तर खेळ आणि कलेमध्ये 'मिशन उत्कर्ष' दरम्यान मुलांचा आत्मविश्वास वाढला. विद्या मंदिर नृसिंहवाडी शाळेची ही यशोगाथा केवळ गुणांपुरती मर्यादित नसून, ती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची गाथा आहे. शिक्षणाधिकारी आणि 'डाएट कोल्हापूर , गटशिक्षणाधिकारी, विस्ताराधिकारी, केंद्रप्रमुख यांच्या मार्गदर्शनामुळे ही शाळा जिल्ह्यात गुणवत्तेचे नेतृत्व करण्यास सज्ज झाली. भविष्यातही ही गुणवत्तेची परंपरा अखंड सुरू राहील, हा आमचा संकल्प आहे !

**नृसिंहवाडी शाळेचा 'मिशन उत्कर्ष' - आव्हानांवर मात करत गुणवत्तेचा नवा कोल्हापुरी पॅटर्न.**








तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये विद्या मंदिरचे यश

**नृसिंहवाडी (राष्ट्रगीत वृत्तसेवा)** अब्दुल लाट ता, शिरोळ येथे नुकत्याच झालेल्या छोटे सायंटिस्ट तालुका स्तरीय स्पर्धेत नृसिंहवाडी विद्या मंदिर चे घवघवीत यश मिळविले या स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक मिळविला. तालुका स्तरीय स्पर्धेत जान्हवी पुजारी ,रुद्रा खोचरे, हर्षवर्धन ढोबळे, आयुष्य पुजारी, यांनी प्रतिनिधित्व केले या स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना शिक्षक, शिक्षिका यांचे मार्गदर्शन लाभले.

### चिंतनशील प्रश्न -

१. तुम्ही शिकवत असलेल्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या इयत्तानिहाय, विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती साध्य नसतील तर अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी तुम्ही तुमच्या वर्गाचे नियोजन कसे कराल? थोडक्यात लिहा.

२. मिशन उत्कर्ष या उपक्रमाचा कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना नेमका कोणता फायदा झाला असावा?

३. इयत्तानिहाय, विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी मुख्याध्यापकांनी कोणकोणत्या अध्ययन -अध्यापन पद्धतीचा अवलंब करावा असे तुम्हाला वाटते ?

### चर्चा प्रश्न -

1. आपल्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना इयत्तानिहाय, विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती साध्य करून देण्यासाठी अध्ययन निष्पत्तीचे मापन आपण कशाप्रकारे कराल?
2. राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणातील आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्तीमधील संपादणूक वाढविण्यासाठी मुख्याध्यापक म्हणून तुम्ही काय नियोजन कराल?आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणातील संपादणूक वाढविण्यासाठी मूल्यांकन प्रक्रियेत कोणते बदल कराल?

### मोड्यूलची शालेय नेतृत्वाच्या दृष्टीकोनातून उपयुक्तता -

1. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये अध्ययन निष्पत्ती आधारित अध्ययनावर भर दिलेला आहे.
2. राष्ट्रीय पातळी, राज्य पातळीवरील मूल्यांकन अध्ययन निष्पत्ती आधारित होत असल्यामुळे या स्तरावरील सर्वेक्षणात संपादणूक वाढविण्यासाठी मदत होते.
3. अध्ययन निष्पत्तीचा विचार करत अध्यापनाची दिशा बदलली तर वर्गात अधिक आनंददायी प्रक्रिया घडून येण्यास मदत होते.
4. विद्यार्थ्यांना अधिक सक्रीय आणि सहभागी बनविते.
5. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मागोवा घेण्यास व मागे असलेल्या विद्यार्थ्यांची संपादणूक सुधारण्यास मदत होते.
6. शिक्षकांना ते वापरत असलेल्या अध्ययन अध्यापन पद्धतीची परिणामकारकता अधिक चांगल्याप्रकारे मोजण्यास मदत करते.
7. विद्यार्थी त्यांच्या स्वतःच्या गतीनुसार शिकतात, ज्यामुळे त्यांना अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास आणि टिकवून ठेवण्यास मदत होते.
8. पालकांना त्यांच्या पाल्याच्या शिक्षणाबद्दल अधिक चांगल्याप्रकारे माहिती देण्यास मदत करते.

## समारोप -

शिक्षणाची गुणवत्ता ही अध्ययन निष्पत्तीला विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादावरच मोजली जाणार आहे. शिक्षणातून परिवर्तनाची वाट चालण्याची गरज या 21 व्या शतकाच्या अनुषंगाने अधोरेखित होत आहे. बदलत्या काळानुसार, विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रचंड प्रगती त्याचबरोबर निर्माण होणारी नवनवीन आव्हाने, समस्या यांना समोर जाणारा विद्यार्थी घडवायचा असेल तर अध्ययन अध्यापनात मुलभूत स्वरूपाचे बदल घडवून आणणे आवश्यक आहे. याच करिता अध्ययन निष्पत्ती आधारित अध्ययन उपयुक्त ठरते.

## संदर्भ -


1. अध्ययन अध्यापन व अध्यापनशास्त्र डी.एल.एड. पुस्तिका
2. शिक्षकपर्व क्षमता आधारित शिक्षण आणि अध्ययन निष्पत्ती NCERT डॉक्युमेंट
3. अध्ययन निष्पत्ती आधारित अध्ययन NCERT डॉक्युमेंट
4. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० डॉक्युमेंट
5. राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण राज्य, जिल्हा रिपोर्ट कार्ड
6. जिल्हा शैक्षणिक स्वास्थ कार्ड -कोल्हापूर
7. देशोदेशीचे शालेय शिक्षण- डॉ. वसंत काळपांडे
8. शिकता शिकविता- निलेश निमकर


## वेबसाईट लिंक -


१. https://parakh.ncert.gov.in/prs-reports-२०२४
२. https://parakh.ncert.gov.in/prs
३. https://parakh.ncert.gov.in/
४. https://ncert.nic.in/NAS.php
५. https://dsel.education.gov.in/en/nas
६. https://ncf.ncert.gov.in/#/web/home
७. https://ncsl.niepa.ac.in/schoolleadershipacademy/pdf/maharashtra/Modules/२०२३-२०२४/MH२३M०१.pdf



**मोड्यूल विकसक**
**महादेव दत्तू वांडरे**
**वरिष्ठ अधिव्याख्याता**
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर**

**समन्वयन**
**डॉ. ज्योती कुलकर्णी**
**प्रशासकीय अधिकारी**
**महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा)**
**छत्रपती संभाजीनगर**

**मार्गदर्शन**
**श्री.प्रकाश मुकुंद**
**संचालक**
**महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा)**
**छत्रपती संभाजीनगर**